# भारताचे सैनिक सामर्थ्य

## डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे

**भा**रतीय सुशिक्षितांमध्ये जे अनेक प्रकारचे भ्रम प्रचलित आहेत. त्यात आजपर्यंत स्वतंत्र भारताने लादलेली युद्धे व भारत आणि पाकिस्तान व चीन यांचे सैनिक बलाबल याबद्दलचे भ्रम सर्वात भयावह आहेत. त्यामुळे भारताच्या सैनिक सामर्थ्याचे वास्तविक दर्शन घडवून देणे अत्यन्त आवश्यक आहे. हे भ्रम असेच कायम राहिले तर भारतावरील एका भयंकर संभाव्य संकटाविरूद्ध उपाययोजना कधीच केली जाणार नाही.

सैनिक सामर्थ्याची पाच परिमाणे आहेत. त्यातील सर्वात महत्वाचे परिमाण शस्त्रास्त्रांची श्रेष्ठता हे आहे. अधिक प्रभावी शस्त्रांच्या शोधामुळे इतिहास बदलला अशी अनेक उदाहरणे दाखवून देता येतील. लोखण्डी शस्त्रांच्या शोधाने हिटाईट लोकांनी इजिप्तच्या साम्राज्याविरूद्ध विजय मिळविले, घोड्यांच्या रिकिबीच्या शोधाने ग्रॉथ लोकांनी रोमचे साम्राज्य धुळीला मिळविले, हत्तीं विरूद्ध घोड्यांच्या प्रभावी उपयोगाने शिकन्दराने भारतीय सैन्यांचा पराभव केला, तोफांच्या उपयोगाने बाबराने राणा संगासारख्या योद्ध्याला धूळ चारली व पुढे तोफा आणि बन्दुका यांच्या प्रगत तंत्राने इंग्रजांनी भारत जिंकला. १८५७ साली भारतीय क्रांतिकारकांजवळ प्रत्येक सैनिकाच्या हाती देण्याइतक्या बंदूका नव्हत्या, पुष्कळसे सैनिक तरवारी व भाले यांनीच लढत होते हे १८५७चा उठाव फसण्याचे प्रमुख कारण आहे, "सरंजामशाहीचे पुनरूज्जीवन", "जनतेचा पाठिंबा नसणारे शिपायांचे बण्ड" ही ते युद्ध फसण्याची कारणे हा आंग्लशिक्षितांच्या अशिक्षितांचा अज्ञ कुकल्पनांचा विकृत विलास आहे. १८५७ वर भाष्य करणारा समकालीन पत्रकार जगद्विख्यात कार्ल मार्क्स यानेच हे कारण असे स्पष्टपणे लिहून ठेवले आहे.

शस्त्रास्त्रांची श्रेष्ठता या परिमाणाच्या बाबतीत भारतीय सैन्याची आजची परिस्थिती समाधानकारक नाही. भारताचा संभाव्य शत्रू पाकिस्तान याची शस्त्रास्त्रे अमेरिकन आहेत, भारताची रशियन आहेत. अमेरिकन शस्त्रास्त्रे रशियन शस्त्रास्त्रापेक्षा श्रेष्ठ आहेत असे अनेक वेळा सिद्ध झाले आहे. शिवाय सोव्हिएट युनियनच्या विभाजनापासून पूर्वी जी रशियन शस्त्रास्त्रे मिळत होती त्यांच्यातही वांधा आला आहे. मिग विमानाचे सुटे भाग मिळणे कठीण झाल्यामुळे त्यांचे संधारण करून त्यांना वापरण्या योग्य ठेवणे कठीण झाले आहे. हे सुटे भाग सोव्हिएट युनियनच्या निरनिराळ्या प्रदेशात होत होते. हे सारे प्रदेश आता विलग झाल्यामुळे सतरा भाग सतरा ठिकाणाहून गोळा करावे लागतात. बोफोर्स तोफांचा दारूगोळा फक्त अभ्यासापुरता मिळतो. पुरेसा दारूगोळा व तोफांचे संधारण करणे कठीण झाले आहे. रणगाड्यांची स्थितीही समाधानकारक नाही. ज्याच्याबद्दल फार गाजावाजा करण्यात आला तो विजयन्ता रणगाडा रणांगणावर निरूपयोगी ठरला आहे. नवीन अर्जुन रणगाडा तयार करण्यात आला आहे. तो कितपत उपयोगी आहे हे अजून ठरायचे आहे. शिवाय या रणगाड्याचे ऊर्जक-एन्जिन-जर्मनीकडून घेतलेले आहे. आमच्या वैज्ञानिकांना १६०० अश्वशक्तीचे ऊर्जुक तयार करता येत नाही. त्यामुळे विमाने, रणगाडे वगैरे सर्वच बाबतीत आपण परावलंबी आहोत.

साधी विमाने, रणगाडे, तोफा वगैरे बाबतीतच जो देश परावलम्बी आहे तो अणुशस्त्रांच्या बाबतीत स्वावलंबी असेल हे शक्य नाही. पोखारान येथे आमच्या वैज्ञानिकांनी अणुस्फोट केला म्हणून भारताजवळ अणुबॉम्ब आहे असे अनेक सुशिक्षितांना वाटते. पण अणुस्फोट म्हणजे अणुबॉम्ब नव्हे. शिवाय जो अणुस्फोट केला गेला तो देखील अमेरिकेचे इन्धन बेकायदेशीररित्या चोरून करण्यात आला असा अमेरिकेचा आरोप आहे.

**गाजरपारखी निवडपद्धती** पाकिस्तानजवळ नऊ अणुबॉम्ब आहेत असे अमेरिकेच्या गुप्तहेरखात्याने सांगितले आहे. भारताजवळ एखादा अणुबॉम्ब असता तर या खात्याला त्याची माहिती मिळाली नसती एवढे आमचे गौप्यरक्षण प्रभावी नाही. तेव्हा भारताजवळ अणुबॉम्ब नाही असाच तर्क करावा लागतो.

***काही वर्षापूर्वी, मुंबई येथे भरलेल्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून स्वा. सावरकरांनी "लेखण्या मोडा व बंदुका घ्या" असा खणखणीत इशारा दिला होता. पण आमच्यातल्याच काही पोरबुद्धीच्या मंडळींना तात्यारावांच्या त्या सूचनेत 'विनोद' आढळला ! सामान्य श्रोत्यांचे राहोच पण पं. नेहरू, कृष्ण मेनन या सारख्या भल्या भल्या राजकारण विशारदांनाही सैनिकीकरणा सारखा महत्वाचा विषय उपेक्षणीय वाटला आणि मग ज्या शोकांतिकेला आपणा सर्वांना सामोरे जावे लागले त्याची ही शोकान्तिका !!***

सैनिक सामर्थ्याचे दुसरे परिमाण साधनसम्पत्ती हे आहे. सैनिकांना फक्त शस्त्रात्रेच लागत नाहीत. त्यांना खायला अन्न, प्यायला पाणी, ल्यायला वस्त्र व उन/थण्डी/पावसापासून रक्षण करणारे छत्र हवे असते. म्हणजे साधारण नागरिकाला जगायला जे जे लागते ते ते सर्व सैनिकालाही लागते. जेवढे मोठे सैन्य तेवढी ही सामग्री मोठ्या प्रमाणात लागते, ते, सैन्य जेथे असेल तेथे योग्य वेळेस पोचेल याची चोख व्यवस्था असावी लागते. सैन्याला लागणाऱ्या या साधनसम्पत्तीला रसद म्हणतात. अशी रसद वेळेवर न पोचणे छोट्या सैन्यापेक्षा मोठ्या सैन्याला अधिक घातक असते. कारण त्याला लागणारी सामग्री त्याचा जेथे संचार होतो तेथेच मिळणे दुर्घट असते. ती सरकारला आपल्या साठ्यातूनच पोचवावी लागते.

मोठ्या सैन्याच्या या अडचणीचा मराठ्यांनी आपल्या युद्धनीतीत पुरेपूर फायदा घेतला होता. कारतलबखानाच्या मोठ्या सैन्याला लागणारे पाणी उम्बरखिण्डीत मिळू शकत नाही असे हेरून शिवाजीमहाराजांनी आपल्या गनीमी हालचालींनी त्याला उम्बरखिंण्डीत आणले व खिंण्डीची नाकेबंन्दी केली. नाकेबंन्दी केल्यावर कारतलबखानाच्या सैन्याला प्यायला पाणी देखील न मिळाल्यामुळे ते शरण आले. औरंगजेबाशी झालेल्या पंचवीस वर्षाच्या युद्धात मराठ्यांनी मध्यप्रदेश व बिहार अशा दूरच्या ठिकाणी जाऊन औरंगजेबाची रसद मारली व त्याला जेरीस आणले.

साधनसंम्पत्तीच्या बाबतीत भारत पाकिस्तानपेक्षा खूपच समृद्ध आहे. पण समृद्धीच्या बाबतीतल्या या वरचढपणाचा फायदा फक्त दीर्घकालीन युद्धात मिळू शकेल. यापूर्वी झालेल्या दोन आठवड्यांच्या युद्धात याचा फायदा मिळणे शक्य नव्हते. यानंतरही भारत/पाकिस्तानचे दीर्घकालीन युद्ध होण्याचा संभव आहे असे वाटत नाही.

सैनिक सामर्थ्याचे तिसरे परिमाण सैनिकांची व त्यांच्या अधिकाऱ्यांची गुणवत्ता हे आहे. या गुणामध्ये शौर्य व काटकपणा हे गुण प्रधान आहेत. अन्न, पाणी व विश्रान्ती यांच्याशिवायदेखील दीर्घकाल कार्यक्षमता टिकविता येणे हे काटकपणाचे लक्षण आहे. असा काटकपणा अंगभूत असतो तसाच तो प्रशिक्षणाने देखील निर्माण करता येतो.

साध्या जवानांना वरील दोन गुण लागतात. सैनिक अधिकाऱ्यांना मात्र याच्या जोडीला नेतृत्वाचे गुण देखील अंगी असावे लागतात. हे नेतृत्वाचे गुण पारखण्यासाठी निवडमंडळे स्थापन केली गेली आहेत. पण या निवडमंण्डळांनी वापरलेल्या कसोट्या कितपत समाधानकारक आहेत या बद्दल ६५च्या लढाईनंतर संदेह निर्माण झाला आहे. ६५ च्या लढाईत ज्या अधिकाऱ्यांनी पराक्रम केला त्यापैकी काही तात्पुरते घेतले गेले होते. लढाई संपल्यावर त्यांनी आपल्याला नोकरीवर कायम करण्यात यावे म्हणून अर्ज केले. पण निवडमंडळाने त्यांचे अधिकारीगुण समाधानकारक नाहीत म्हणून त्यांना नाकारले. याविरूद्ध फारच आरडाओरड झाली, समाजवादी पुढारी मधु लिमये यांनी या नाकारलेल्या अधिकाऱ्यांचा एक मोर्चा पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या निवासस्थानावर नेला. तेव्हा पंतप्रधानांनी सम्बंधीत अधिकाऱ्यांशी विचारविनिमय करून असे ठरवले की ज्यांचे रणांगणावरील कार्य चांगले होते त्यांना निवडमंडळाकडे न पाठवताच सैन्यात कायम करण्यात

**यावे. पण मुळात जी निवडमंडळे प्रत्यक्ष रणांगणावर कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांना नाकारतात त्यांच्या पद्धती कितपत यथार्थ आहेत या प्रश्नाचा विचार झालाच नाही.**

### लाहोर क्षेत्रात भारतीय जवानांची कत्तल

सैनिक सामर्थ्याचे चौथे परिमाण म्हणजे सेनापतीचे व्यूहकौशल्य हे आहे. शिवाजीमहराजांनी मिळविलेले विजय हे मुख्यतः त्यांचे व्युहकौशल्य व सैनिकांचे मनोबल यांच्या आधारावर मिळवलेले होते. आतापर्यंत, ब्रिटीश सेनापती भारतीय सैन्य सोडून गेल्यानंतर झालेल्या युद्धात भारतीय सेनापतींनी दाखवलेले व्युहकौशल्य फारसे स्पृहणीय नाही. याचे अत्यंत खेदजनक उदाहरण ६५ च्या लढाईतील ज. चौधरी यांच्या व्युहरचनेचे आहे. भारतीय सैन्याने चोवीस तासाच्या आत लाहोर काबीज करायचे व मग पंतप्रधानांनी लाहोरमध्ये जाऊन "तुम्ही काश्मीरवरील सर्व दावे सोडल्याशिवाय आम्ही लाहोर सोडणार नाही" असे पाकिस्तानला बजावायचे असा व्युह रचण्यात आला. लाहोर काबीज करण्यासाठी रात्री दोन वाजता भारतीय सैन्याचे पायदळ निघाले ते सकाळच्या सुमारास लाहोरमध्ये पोचले. त्यांनी लाहोरचे विमानतळ काबीज केले व बाकीच्या लाहोरसाठी लाहोरमधील शालिमार बगीच्यात युद्ध सुरू होते असे पाकिस्तान नभोवाणीने सांगितले.

युद्धशास्त्राचा प्राथमिक नियम असा आहे की आघात करण्यासाठी रणगाडे व तोफा यांचा उपयोग करावा व मग, शत्रू रणगाडे व तोफा यांच्या माऱ्याने नामोहरम झाला की पायदळाने त्याची भूमि काबीज करावी. ज. चौधरींनी हा साधा नियम पाळला नाही. कारण पाकिस्तानचे रणगाडे आपल्या पायदळावर मारा करण्याच्या आधीच आपण आपले रणगाडे पायदळाच्या मागोमाग लाहोरात पोंचवू शकू असा त्यांना विश्वास वाटत होता. पाकिस्तानने त्यांच्या या विश्वासाचा फायदा घेऊन भारतीय पायदळाला लाहोरच्या आधी अडवलेच नाही, त्यांना सरळ लाहोरपर्यंत जाऊ दिले व मग भारताचे रणगाडे लाहोरकडे जायला निघाल्यावर इचोगिल कॅनालवर त्यांना अडविले. या कालव्याचा उपयोग रणगाडे अडवण्यासाठी करण्यात येऊ शकतो हे ज. चौधरींना माहीत नव्हते. तसेच लाहोर मार्गावर पाकिस्तान्यांनी जागोजागी पिल बॉक्सेस म्हणजे भूपेटिका तयार केल्या होत्या. त्यांच्या संरक्षणाखाली शत्रूच्या रणगाड्यावर रणगाडाभेदी बन्दुकांचा मारा करता येत असे. असा मारा करणारे सैनिक भूमिच्या आत असल्यामुळे भारतीय रणगाड्यांच्या तोफांचा त्यांच्यावर काही परिणाम होऊ शकत नसे. याचा परिणाम असा झाला की आमचे रणगाडे आमच्या पायदळाच्या मदतीला लाहोरपर्यंत पोहचूच शकले नाहीत व आमचे पायदळ पाकिस्तानी रणगाड्यांच्या तावडीत सापडून त्यांची हजारोंच्या संख्येने कत्तल झाली.

भारतीय सेनापतींच्या व्युहकौशल्याचे दुसरे खेदजनक उदाहरण ज्याला ऑपरेशन ब्लू स्टार म्हणतात, त्या सुवर्णमंन्दिरावरील हल्ल्याचे आहे. हे मंदीर भारताच्याच हद्दीत आहे, शत्रूच्या ताब्यातील प्रदेशात नाही. त्याचा आश्रय घेऊन खूनखराबी करणारे अतिरेकी कोणत्याही सरकारचे सैनिक नव्हते. त्यांना पाकिस्तान शस्त्रास्त्रे पुरविते असे आमचे सरकार सांगते, ते खोटे मानण्याचे कारण नाही. पण या मंदिराचा आश्रय घेऊन उपद्रव देणाऱ्या अतिरेक्यांचा बंदोबस्त करण्यासाठी आमचे इतके जवान खर्ची पडले की आम्ही जणू पाकिस्तानच्या प्रदेशात असलेला व पाकिस्तानी सैन्याने संरक्षिलेला एखाद किल्लाच घेतला असे वाटावे. मंदिरात गुपचूप आत घुसून अतिरेक्यांचा खात्मा करणे काही आम्हाला जमले नाही. शिवाजीमहाराज एक लक्ष फौजेच्या गराड्यात असलेल्या शाहिस्तेखानाच्या निवासात शिरले व कापाकापी करून सुरक्षिपणे परत आले. आमच्या सेनापतींकडून अशा तऱ्हेच्या हिकमतीची अपेक्षा करता येत नाही असे सुवर्णमंदीरावरील कारवाईवरून म्हणावेसे वाटते.

सैनिक सामर्थ्याचे पाचवे परिमाण म्हणजे शत्रूच्या हालचालीच्या बित्तंबातम्या हे आहे.

### ७१ सालचे युद्ध हे रशियाचे युद्ध

आमचे हेरखाते कितपत कार्यक्षम आहे हे वर म्हटल्याप्रमाणे लहोरमार्गावरील भूपेटिकांची माहिती नसणे व सुवर्णमंदीरात कोणत्या शस्त्रानिशी किती अतिरेकी लपले आहेत हे विचारात न घेता कारवाई करणे यावरून स्पष्टच आहे. तसेच ६२ सालच्या लढाईत तिबेटमधील चीनी सैन्याची काय हालचाल आहे याचे पूर्ण अज्ञान आपल्या सरकारला होते यावरूनही आपले माहितीखाते अत्यन्त अक्षम आहे असाच निर्णय द्यावा लागतो.

शत्रुराष्ट्राच्या हालचाली तर सोडाच आपल्याच देशातील देशद्रोही कारवायांची सरकारला मुळीच माहिती नसते याचाही प्रत्यय, राजीव गांधींचा खून, व मुम्बईत परदेशातून स्फोटके आणून करण्यात आलेला बॉम्बस्फोट यावरून आलाच आहे.

आम्ही ७१च्या लढाईत पाकिस्तानचा पराभव केला तेव्हा आमच्या सैनिक सामर्थ्याची परिस्थिती वर वर्णन केल्याप्रमाणे केविलवाणी नसावी असे काही वाचकांना वाटण्याचा संभव

आहे. पण ७१च्या युद्धाबद्दल दोन गोष्टी विसरण्यात येतात. एक म्हणजे या युद्धात आपल्याला रशियाने शस्त्रास्त्रांची, स्वतःच्या हेरयंत्रणेची, आपल्या सेनापतींच्या योजनाकौशल्याची मदत केली. पाकिस्तानला अशी कोणतीही मदत नव्हती. अमेरिकेने आपले जहाज बांगला देशाच्या सीमेवर पाठवले होते, ते बांगला देशाच्या समुद्रकिनाऱ्यापर्यंत पोचूच शकले नाहीत, त्यामुळे त्यांना युद्धबंदी व्हावे लागले. युद्ध सुरू असताना अमेरिकेने पाकिस्तानला कोणतीही मदत केली नाही. उलट पाकिस्तानच्या बांगलादेशविषयक नीतीबद्दल अमेरिका नाखुष होती व ब्रिटीन तर आपली प्रत्यक्षच दर्शवीत होते. तेव्हा ७१ सालचे युद्ध हे एकीकडे रशिया/भारत युति व एकीकडे एकटे पाकिस्तान असे झाल्यामुळे यावरून भारताचे सैनिक सामर्थ्य पाकिस्तानहून वरचढ होते असे अनुमान निघत नाही.

या अनुमानाच्या उलट पुरावा याच युद्धात दिसून आला. याच युद्धात पाकिस्तानने भारताच्या हातून काश्मिरमधील छम्बचा भाग हिसकून घेतला. भारताने युद्ध जिंकूनही तो भाग भारताला परत मिळाला नाही.

आतापर्यंत रेखाटलेले भारताच्या सैनिकी सामर्थ्याचे चित्र भयावह आहे यात शंका नाही. पण याबाबतीत भारतीय सुशिक्षित स्वप्नरंजनाच्या दुनियेत राहत आहेत म्हणून त्यांना जागे करण्याची आवश्यकता आहे.

पाकिस्तान व भारत १९४७ साली स्वतंत्र झाले तेव्हा पाकिस्तानचे सैनिक सामर्थ्य नगण्य होते. त्याच्याजवळ अवघे आठ रणगाडे होते व वायुदळ नव्हते. ब्रिटिशांनी दुसऱ्या महायुद्धात तयार केलेली सुसज्ज फौज भारतालाच मिळाली. जवळ जवळ दहा वर्षे भारत, पाकिस्तानला मनात येईल तेव्हा नष्ट करू शकेल अशी परिस्थिती होती. पण पाकिस्तानने आपले सैनिक सामर्थ्य त्यानंतर एवढे वाढविले की आज पाकिस्तानचा निर्णायक पराभव करणे भारताला शक्य राहिले नाही, उलट पाकिस्तानजवळ असलेल्या नऊ अणुबॉम्बने भारताचा केव्हा विध्वंस होईल याची शाश्वती उरलेली नाही. याविरूद्ध आपल्या सरकारने गुप्तपणे काही उपाय योजून ठेवला असल्यास मला त्याची माहिती होण्याची शक्यता नाही. असा उपाय असेल अशी आशा करण्याशिवाय आपल्या हाती दुसरे काहीही नाही.

हे असे का झाले ? याची अनेक कारणे आहेत. एकतर ब्रिटनसारख्या अतिबलाढ्य शक्तीला केवळ सत्याग्रह करून आम्ही नमविले व स्वराज्य देण्यास भाग पाडले असा भ्रम आमच्या नेत्यात व सुशिक्षितांत देखिल होता.

**अँग्लो कम्युनिस्ट विचार**

याचे एक स्पष्ट उदाहरण म्हणजे सैनिक तयारी न केल्याबद्दल कृष्ण मेनन यांना दुषणे देणारे आचार्य कृपलानी गांधींच्या भारताने सैन्य बाळगणे ही तत्वच्युति आहे, असे स्वराज्याच्या उषःकाली म्हणाले होते. आपल्या सत्याग्रहापुढे ब्रिटीश साम्राज्य नमू शकते तर चीनच पाकिस्तान यांचा काय पाड, आपल्याला शस्त्रास्त्रांची काय जरूर अशी एक वृत्ती आमच्या नेत्यात प्रबळ होती. पं. नेहरूंना देखील भारताने शस्त्रसामर्थ्याकडे लक्ष देण्याची जरूर नाही असे वाटत होते पण याची कारणे कृपलानींपेक्षा वेगळी होती. पं. नेहरूंच्या डोक्यात अनेक स्वप्नील कल्पना घोळत होत्या. त्यापैकी काही अशा, (१) एका देशाने दुसऱ्या देशावर स्वारी करून तो जिंकावा हे अठराव्या शतकात घडत असे, विसाव्या शतकात असे काही घडणार नाही. एखाद्या देशाने भारतावर स्वारी केलीच तर त्यातून विश्व युद्ध निर्माण होईल. त्यामुळे आपल्याला सैनिक तयारी करण्याची जरूर नाही. (२) आपण केवळ भारताचेच नव्हे तर साऱ्या जगाचे पुढारी आहोत, तेव्हा निदान आपण पंतप्रधान आहोत तोपर्यंत भरातावर कोणताही देश स्वारी

करणार नाही. (३) नेहरूंचे बहुतेक विचार कम्युनिस्टांसारखे होते. ४२ ची चळवळ करू नये कारण त्यामुळे रशिया अडचणीत येईल असे म्हणून अशी चळवळ करण्याचा निर्णय गांधीनी घेतला तेव्हा त्यांनी त्याला विरोध केला होता. तेव्हा कम्युनिस्ट देशाचे आक्रमण हे परकीय आक्रमण समजून त्याला तोंड देण्याची इर्षा नेहरूत नव्हती. कम्युनिस्ट आक्रमणामुळे देश भांडवलशाहीच्या पंजातून मुक्त होतो तसाच भारतही होईल, मात्र आपण पंतप्रधान असे पर्यंत आंतरराष्ट्रीय कम्युनिझमचीच भलावण करीत असल्यामुळे कम्युनिस्ट देश भारतावर आक्रमण करणार नाहीत. (४) बाबर/अकबर/औरंगजेबादी मुघल बादशहा हे परकीय आक्रमक नसून "राष्ट्रीय" राज्यकर्तेच होते असे नेहरूंचे मत होते. हे मत त्यांनी अनेक व्याख्यानात व "ग्लिम्प्सेस ऑफ वर्ल्ड हिस्ट्री", "डिस्कव्हरी ऑफ इंडीया" वगैरे ग्रंथात मांडले आहे. डॉ. ताराचंद या इतिहासकारांकडून स्वातंत्र्याच्या चळवळीचा इतिहास लिहवून त्यांनी याच मताचा प्रचार केला. हे मत खरे मानले तर पाकिस्तानने भारत जिंकला तर त्याचे फारसे वैषम्य वाटण्याचे कारण उरत नाही. मुघल हे जर राष्ट्रीय राज्यकर्ते ठरू शकतात तर कालपरवा पर्यंत भारताचेच रहिवासी असलेले व संस्कृती व वंश यांनी त्या त्या प्रांतातल्या भारतीयांशीच एकरूप असलेले पाकिस्तानी भारताचे राष्ट्रीय राज्यकर्ते का ठरू नयेत ? तेव्हा पाकिस्तानच्या आक्रमणाने नेहरूंना पोटतिडिक उठण्याचे कारणच नव्हते. या विरूद्ध फक्त एकच गोष्ट त्यांना महत्वाची वाटत होती, ती म्हणजे पाकिस्तान हे भांडवलशाही राष्ट्रांच्या गटात गेल्यामुळे पाकिस्तानचे भारतावरील आक्रमण हे भांडवलशाहीचे एका समाजवादी राष्ट्रावरील आक्रमण ठरेल. असे आक्रमण कम्युनिस्ट राष्ट्रे सफल होऊ देणार नाहीत. ही राष्ट्रे आपल्या मदतीला येई पर्यन्त पाकिस्तानला थोपवून धरण्याइतकी शस्त्रास्त्रे आपण इकडून तिकडून आणली की पुरे आहे असे नेहरूंचे गणित होते.

वरील विचारांची पार्श्वभूमी भारताला एक बलिष्ठ सैनिक शक्ती बनविण्याच्या दृष्टीनं अत्यंत घातक आहे. या पार्श्वभूमीवर अधिक प्रकाश टाकण्यास पुढील घटना उपयुक्त ठरेल.

रक्षाविज्ञानखात्याने रक्षाविज्ञान प्रयोगशाळा स्थापन केली. तिचे उद्‌घाटन करण्यास पं नेहरू आले.

पं नेहरूंच्या बरोबर अर्थात् रक्षामंत्री कृष्णमेनन व सेनापती ज. थिमय्या देखील आले. सर्वात आधी ज. थिमय्यांचे भाषण झाले. त्यांनी सांगितले की कुणीही शत्रु असला तरी आम्ही त्याचा समाचार घेण्यास तयार आहोत अशा तऱ्हेची सैनिक तयारी करणे भारताला शक्य नाही. आपल्या संम्भाव्य शत्रू कोण याचा विचार करून त्याचा धोका टाळण्यापुरती तयारी करावी लागेल." त्यानंतर रक्षामंत्री कृष्ण मेनन उठले व म्हणाले "जो संभाव्य शत्रू जनरलसाहेबांच्या मनात आहे त्याला अनुलक्षून एक गोष्ट मला आठवते. आम्ही लहानपणी आमच्या शाळेजवळच्या जंगलात फिरायला जात असू. पण तेथे वाघ आहेत असे कुणी तरी आम्हाला सांगितले. तेव्हा "समोर वाघ आला तर काय करावे ?" असे आम्ही आमच्या शिक्षकाला विचारले. तो म्हणाला, "वाघ समोर आल्यावर तुमच्या हाती फक्त त्याला नमस्कार करणेच उरते. बाकी काय करायचे ते वाघच करील."

या सर्व अधरोत्तरांचा अर्थ स्पष्ट आहे. चीन हा सम्भाव्य शत्रू आहे व त्यादृष्टीने आपण तयारी केली पाहिजे असे थिमय्यांचे म्हणणे होते. उलट रक्षामंत्र्यांना चीन आपल्यावर स्वारी करील ही भीति निराधार वाटत होती वा चीनविरूद्ध लढणे अशक्य कोटीतले वाटत होते. नेहरूंचे अर्थात् हेच विचार होते हे त्यांच्या धोरणावरून व या सभेत त्यांनी मेननसाहेबाला दिलेल्या मूक संमतीवरून स्पष्ट होते. ❒